| MHAK070013962022 | दाखल दिनांक | : २८.०९.२०२२ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : २८.०९.२०२२ |
| | निकाल दिनांक | : १२.०३.२०२६ |
| | कालावधी | : ०३ व ०५ म १४ दि |

| | |
|---|---|
| | <u>**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर**</u><br>(पिठासीन अधिकारी श्रीमती डी. एम. पाटील)<br>न्यायनिर्णय घोषित दि. १२.०३.२०२६<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ३४१/२०२२** |
| **निशाणी क्र. ५६** | अपराध क्रमांक : ४९३/२०१८<br>पोलीस स्टेशन : बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>**पोलीस स्टेशन बाळापूर,** ता. बाळापूर, जि. अकोला. |
| **अभियोग पक्षातर्फे वकिल** | श्रीमती एस.आर.लोखंडे, सहाय्यक सरकारी वकिल. |
| **आरोपी** | १. **शेख अकबर शेख बिसमील्ला,**<br>वय– ३२, व्यवसाय – विट एजन्सी,<br><br>२. **शेख अजहर उर्फ अज्जु शेख बिसमील्ला,**<br>वय– २८, व्यवसाय – मजुरी,<br><br>३. **रईसाबी शेख बिसमील्ला,**<br>वय– ५०, व्यवसाय – घरकाम,<br>क्र. १ ते ३ रा.शाईन कॉलनी, डॅम्प गेट, बाळापूर,<br>ता. बाळापूर, जि. अकोला,<br><br>४. **गुलाम अमान गुलाम ख्वाजा,**<br>वय– ४४, व्यवसाय – मजुरी,<br>रा. इस्लाम चौक, गायगाव,<br>ता. बाळापूर, जि. अकोला. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे |

## [फौजदारी मॅन्युअलमधील प्रकरण क्र.६ परीच्छेद ४४]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०३.११.२०१८ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | ०५.११.२०१८ |
| दोषारोपपत्राची तारीख | २४.०३.२०१९ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०९.०५.२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | २९.०१.२०२६ |
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | १२.०३.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | -- |

## आरोपींची सविस्तर माहिती.

| आरोपी चा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला सजा झाली. | आरोपी ची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेख अकबर शेख बिसमील्ला | २८.०१.२०१९ | १०.०४.२०१९ | भा.दं.वि. कलम २९४, ५०६ अन्वये | आरोपींची निर्दोष सुटका १२.०३.२०२६ | -- | -- |
| २ | शेख अजहर शेख बिसमील्ला | २८.०१.२०१९ | १०.०४.२०१९ | | | | |
| ३ | रईसाबी शेख बिसमील्ला | २८.०१.२०१९ | ०८.०४.२०१९ | | | | |
| ४ | गुलाम अमान गुलाम ख्वाजा | २८.०१.२०१९ | १०.०४.२०१९ | | | | |

## <u>सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी</u>.

अ. **सरकारी साक्षीदारः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | सिमा महादेव सुरवाडे उर्फ सिमा परविन शेख बिसमिल्ला (नि.क्र. ५२) | फिर्यादी |

ब. **बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः–**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

क. **न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः–**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी.**

अ. **सरकार पक्षातर्फेः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ब. **बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| १ | ५५ | घटनास्थळ पंचनामा |

क. **न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ड. **जप्त वस्तुंचे वर्णनः–**

| अनुक्रमांक | वस्तूंचा नंबर | वस्तूचे वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## न्यायनिर्णय

(घोषणा तारीख १२.०३.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (थोडक्यात 'भा.दं.वि.') कलम २९४, ५०६ अन्वये संपरीक्षा सुरु आहे.

## प्रकरणाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे –

२. फिर्यादी सिमा महादेव सुरवाडे, रा. लोटनापुर, बाळापुर, ता. बाळापुर, जि. अकोला यांनी पोलीस स्टेशन बाळापूर येथे तक्रार दिली की, दि. ०३.११.२०१८ रोजी दुपारी ०२.३० वाजताच्या सुमारास लोटनापुर, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला येथे आरोपींनी फिर्यादीला ''तु मेरे बापसे क्यु चुदवाती, तेरे को और तेरे बहेनको चोदता''अशी अश्लील शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.

३. सदर फिर्याद अन्वये आरोपींविरुध्द बाळापूर पोलीस स्टेशनमध्ये गु.र.क्र. ४९३/२०१८ अन्वये भा.दं.वि. कलम २९४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अमंलदार श्री. सोहेल शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी प्रकरणाचा तपास करुन तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी ४५ वर भा.दं.वि २९४, ५०६ प्रमाणे आरोप ठेवले. ते आरोपींना वाचून व समजावून सांगितले असता त्याने नाकबुल करुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. सदर प्रकरणात फिर्यादी व आरोपी यांनी तडजोड अर्ज (नि.क्र. ५०) अभिलेखावर दाखल केला. परंतु, आरोपींविरुध्द दाखल करण्यात आलेला गुन्हा भा.दं.वि. कलम २९४ हा तडजोड पात्र गुन्हा नसल्याने सदर गुन्ह्यासाठी परवानगी नाकारली. सदर प्रकरणात आरोपी व फिर्यादी यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्यामुळे तांत्रिक अडचण येवू नये म्हणून अभियोगपक्षाने केवळ फिर्यादीला तपासले. आरोपींविरुध्द कोणताही सकृतदर्शनी पुरावा मिळून न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर.लोखंडे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व पुरावा व कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे प्रश्न निश्चितीकरीता उपस्थित होतात व त्यावर मी माझे निष्कर्ष कारणांसहित नोंदविले आहेत.

| अ.क्र. | <u>प्रश्न</u> | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि. ०३.११.२०१८ रोजी दुपारी ०२.३० वाजता, लोटनापूर, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला, येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी सिमा महादेव सुरवाडे यांना ''तु मेरे बापसे क्यु चुदवाती, तेरे को और तेरे बहेनको चोदता'' अशी अश्लील भाषेमध्ये शिवीगाळ केल्याने भारतीय दंड संहिता कलम २९४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याचे उद्देशाने धमकी दिल्याने भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**७.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी वरील प्रमाणे फिर्यादीला तपासले. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी आपसात तडजोड झाली असलेबाबतचा तडजोड अर्ज (नि.क्र. ५०) व पुरसीस (नि.क्र.५१) दाखल केले आहे. प्रकरण आपसात झाल्यामुळे न्यायालयाचा वेळ आणि संसाधनाचा अपव्यय होवु नये म्हणुन इतर साक्षीदारांना तपासुन काही साध्य होणार नसल्याने त्यांना तपासण्यात आले नाही. नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>प्रश्न क्रमांक १ व २ करीता</u> -**

८. वरील दोन्ही प्रश्न एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदविण्यात येत आहे.

९. सिमा सुरवाडे उर्फ सिमा परविन (स.सा.क्र. १) ही प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन तिने तिच्या साक्षीत, घटनेला ४-५ वर्ष झाले असुन तिचे आणि आरोपी यांचेत घरगुती कारणावरुन बोलचाल झाल्यामुळे तिने रागाच्या भरात आरोपी विरुध्द

रिपोर्ट दिल्याचे सांगितले. रिपोर्ट वरील सही तिने मान्य केली असुन त्यातील मजकूर मला माहित नसल्याचे कथन केले आहे.

**१०.** फिर्यादी अभियोग पक्षास समर्थन देत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी तिला उलटतपासाच्या अनुषंगाने प्रश्न विचारले, परंतु फिर्यादीने तिची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असल्याची बाबी मान्य केली असुन आरोपींकडून तिला अश्लील शिवीगाळ केल्याची व धमकी दिल्याची बाब तिने नाकारली आहे. सबब, अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी मिळेल असे तिच्या पुराव्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही.

**११.** मा. सर्वोच्च न्यायालय **मदन मोहन अबोट विरुध्द पंजाब राज्य (२००८) ४ एस.सी.सी. पान नं. ५८२** या न्यायनिर्वाळयात समाजात आपसी सलोखा प्रस्थापित करणे करीता तडजोडपात्र नसलेल्या गुन्हयामध्ये न्यायालयाने प्रकरण निकाली करण्याच्या दृष्टीने योग्य त्या प्रक्रियेचा अवलंब करुन आणि कार्यवाही करुन तजविज करावी असे प्रतिपादन केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी आणि आरोपी यांचेत न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली असल्याने त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे. वरील परिस्थितीत प्रकरण चालविल्यास त्यांचेतील आपसी संबंध खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे परिणामी समाजामधील सलोखा प्रभावित होणार असल्याने उपरोक्त न्यायानिवाडयातील न्यायतत्व विचारात घेवुन प्रकरण निकाली काढणे योग्य होणार आहे. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी मिळेल असे काहीही साक्षीदाराच्या साक्षीतुन निष्पन्न झाले नाही, त्यामुळे साक्षीदाराचा पुरावा विश्वासार्ह नाही.

**१२.** वरील सर्व विवेचनावरुन असे आढळून येते की, फिर्यादीने अभियोग पक्षास समर्थन दिले नाही. उलटपक्षी आरोपी सोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणात परिस्थितीजन्य पुरावे जसे की, घटनास्थळ पंचनामा आरोपींतर्फे मान्य करण्यात आला असला तरी प्रकरणातील मुख्य साक्षीदार म्हणजे फिर्यादीने तिला अश्लील शिवगाळ व धमकी दिल्याच्या बाबी पुराव्यात नाकारल्या असल्याने सदर परिस्थितीजन्य पुराव्यांना काही महत्व राहत नाही. सबब, उपलब्ध

पुरावा आरोपींनी भा.दं.वि. कलम २९४, ५०६ अन्वये गुन्हा केला हे निसंशयपणे सिध्द करु शकत नाही. तरी कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार अशा संदिग्ध व अस्पष्ट पुराव्याचा फायदा आरोपींना मिळणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मी प्रश्न क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारात्मक नोंदवित आहे. सबब, प्रश्न क्र. ३ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. आरोपी क्र. १ **शेख अकबर शेख बिसमील्ला**, आरोपी क्र. २ **शेख अजहर शेख बिसमील्ला**, आरोपी क्र. ३ **रईसाबी शेख बिसमील्ला** आणि आरोपी क्र. ४ **गुलाम अमान गुलाम ख्वाजा** याची भारतीय दंड विधान कलम २९४, ५०६ च्या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तीक व जामिनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी रु. १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व त्याच रकमेचे लायक जामीनदार द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यात आला.)

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.03.13 12:03:51 +0530

दिनांक : १२.०३.२०२६.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 12/03/2026 |
| Judgment signed by P.O on | :- | 12/03/2026 |
| Judgment uploaded on | :- | 13/03/2026 |